लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूमची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com



विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ६४ वा | गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते आज होणार सोलापूर विमानतळाचे उद्घाटन

## ◆ सोलापूर विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (DGCA) लायसन्स मंजूर

## ◆ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून विमानतळावरील उद्घाटन पूर्वतयारीची पाहणी व आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विमानतळाचे उद्घाटन दिनांक 26 सप्टेंबर 2024 रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे येथून दूरदृश्य प्रणाली द्वारे होणार आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळावर नव्याने करण्यात आलेल्या कामांची पाहणी करण्यात आली. तसेच प्रधानमंत्री महोदयाच्या हस्ते होणाऱ्या उद्घाटनाच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरण प्रशासनाने केलेल्या तयारीची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदूने, विमानतळ प्राधिकरणचे बनोथ चांप्ला त्यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.




यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळावरील सर्व कामकाजाची पाहणी करून माननीय प्रधानमंत्री महोदय यांच्या हस्ते पुणे येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे होणाऱ्या उद्घाटन समारंभाच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरणाने केलेल्या तयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

**DGCA कडून लायसन्स मंजूर**

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (DGCA) चे दिनांक 11 व 12 सप्टेंबर 2024 रोजी सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने विमानतळाची पाहणी व तपासणी करून गेले होते. यामध्ये विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणाली द्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी डीजीसीए कडून करण्यात आलेली होती. विमान वाहतूक सुरू करण्याच्या अनुषंगाने असलेली सर्व मानके सोलापूर विमानतळ प्राधिकरण कडून पूर्ण करण्यात आलेली असल्यामुळे आज डीजीसीए कडून सोलापूर विमानतळावरून विमान उडणे व उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

तत्पूर्वी ब्युरो ऑफ सिविल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळीवर अत्यंत काटेकोरपणे तपासणी केली. विमानतळ प्राधिकरण कडून सुरक्षेच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटी चे अधिकारी तपासणीसाठी आलेले होते. त्यांची तपासणी झाल्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी आली होती. तपासण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीजीसीए कडून सोलापूर विमानतळाला आज विमान लँड होणे को टेकऑफ करण्याची लायसन्स प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

# राज्यव्यापी लिंगायत जोडो बसव यात्रा

## मंगळवेढा ते मुंबई यात्रेस 22 ऑक्टोबर पासून प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र सरकारला जागे करण्यासाठी राज्यातील एक कोटी लिंगायत समाजाच्या न्याय व हक्कासाठी महात्मा बसवण्णा यांचे विचारांची लिंगायत जोडो बसवज्योत रथयात्रा मंगळवेढा ते मुंबई प. पुज्य चन्नबसवानंद महास्वामीजी व राष्ट्रीय लिंगायत संघ संस्थापक प्रदिप बापू वाले(सांगली) व जागतिक लिंगायत महासभेचे प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे (सोलापूर) नेतृत्वाखाली निघणार आहे असल्याची माहिती प्रदीप वाले यांनी दिली.

महाराष्ट्रातील लिंगायत समाजाच्या प्रमुख मागण्यासाठी बसवज्योत रथ यात्रा असून लिंगायत समाज ठरवणार सत्ता कोणाची असावी. ६० मतदारसंघात आपण निर्णायक आहोत. या यात्रेत महाराष्ट्रातील विविध संघटना व बसवप्रेमीचा सहभाग असणार असे महाराष्ट्र समन्वयक विजयकुमार हत्तुरे यांनी सांगितले.




**लिंगायत समाजाच्या न्याय व हक्कासाठी प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे**

१) लिंगायत धमार्ला संविधानीक मान्यता व अल्पसंख्यांक दर्जा देण्यात यावा.

२) महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे महात्मा बसवण्णा यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणी करावे.

३) लिंगायत समाजातील हिंदू लिंगायत दाखल्यासहीत सर्व पोटजातींना ओबीसी चे आरक्षण देण्यात यावे.

४) महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाला ५ हजार कोटी निधी मिळावा.सरसकट लिंगायत समाजाला लाभ मिळावा.

५) लिंगायत समाजाला महाराष्ट्रामध्ये भाषिक अल्पसंख्यांक व केंद्रामधे अल्पसंख्यांक दर्जा द्यावा.

६) महात्मा बसवण्णा यांचे वचन साहीत्य शैक्षणीक अभ्यासक्रमात घ्यावे.

७) लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये व नोकरी मध्ये प्राधान्य द्यावे. प्रत्येक जिल्हयात राहण्यासाठी वसुतीगृह पाहिजे.

८) लिंगायत समाजाला जनगणना मध्ये वेगळा कॉलम द्यावा.

९) लिंगायत समाजातील शरण स्थळांना व मठांना तिर्थ क्षेत्राचा अ वर्ग दर्जा देण्यात यावा.

१०) गाव तिथे स्मशानभुमी (रुद्रभूमी )साठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

११) दिल्ली येथील नविन संसद भवनास महात्मा बसवण्णा यांचे नाव द्यावे.

**लिंगायत जोडो बसव यात्रा 22 ऑक्टोबर सुरुवात**

मंगळवेढा - सोलापूर - अक्कलकोट - मुक्काम १ - मुरूम - उमरगा - लातूर - अहमदपूर मुक्काम २ - लोहा -नांदेड -गंगाखेड - परळी वैजनाथ -अंबेजोगाई - कपिलधारा ३ - धाराशिव - बार्शी - पंढरपूर ४ - सांगोला - जत - गुड्डापूर - डफळापूर - कवठे महांकाळ ५ - मिरज - जयसिंगपूर - अल्लमप्रभु -कोल्हापूर - जोतिबा - वारणानगर ६- कराड - सातारा -कोरेगाव - शिगंणापूर शिखर - फलटण ७ - जेजुरी खंडोबा - सासवड - पुणे - निगडी ८ - कार्ला - लोणावळा - कर्जत - अंबरनाथ ९ - कल्याण - ठाणे - आझाद मैदान मुक्काम १०- मुंबई मंत्रालय ११ समारोप.

या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन मुलगे,चन्नवीर भद्रेश्वरमठ, तुकाराम माळी,अशोक भांजे, नामदेव फुलारी,राजशेखर कापसे,सकलेश बाभूळगावकर, विजयकुमार कुलकर्णी,नागेश पडणुरे आदी उपस्थितीत होते.

# दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे 'आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक' पुरस्कार जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडी यांच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार, आदर्श शाळा, गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतसंस्था मंद्रुप ची वार्षिक सर्वसाधारपण सभा

शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष महिबूबसाब सवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुरस्काराचे यंदाचे १२ वे वर्ष असून वितरण समारंभ जुळे सोलापुरातील मारुती मंगल मंगल कार्यालय येथे होणार आहे.

माजी आ. दिलीपराव माने यांच्या हस्ते आणि राज्य संघाचे ज्येष्ठ सल्लागार बाळासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण होणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

**शनिवारी पुरस्कार वितरण सोहळा**




अधिकारी कुलदिप जंगम हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी प्रमुख पाहणे म्हणून बाळासाहेब शेळके, सुरेश हसापुरे, अमर पाटील, उत्तमराव जमदाडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती दक्षिण सोलापूर मल्हारी बनसोडे, ज्येष्ठ शिक्षक नेते शिवानंद भरले, सोलापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, सोलापूर जिल्हा पतसंस्था संचालक शिवाजी पाटील, राजकुमार बिज्जरगी, मंद्रूप पतसंस्था अध्यक्ष सुनील बिराजदार, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी सरस्वती भालके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी तालुक्यातील एकूण १३ केंद्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे १३ शिक्षक, अक्कलकोट तालुक्यातील १, एक उर्दू व एक कन्नड अशा १५ शिक्षकांचा व ४ गुणवंत अधिकारी व कर्मचारी यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराच्या स्वरूप आहे.

या पत्रकार परिषदेस मल्लिनाथ पुजारी, भिमराव पाटील, शिवाजी पाटील, दयानंद वठारे. बालाजी गुरव, पिरप्पा हडपद, विनोद कोळी, संजय देवकते, रेवणसिद्ध हत्तुरे, अंजली जमखंडीकर, विद्या जगताप, अपेक्षा रणदिवे आदी उपस्थित होते.

**हे आहेत आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी**

जाकेराबी अब्दुल कादर मुलाणी (शिरवळ), रविंद्र पाटील (नांदणी), रेवप्पा बिराजदार (तेलगाव), सोनाली कोरे (धोत्री), शोभा काटकर (हत्तूर), मंगल कोनापूरे (औज आ.), सुरेश डफळे (मनगोळी), मल्लिकार्जुन तामदंडी इसरगुंडे (कुंभारी), सोनाली कदम (कारकल), संजय राजमाने (मंद्रुप), शेकप्पा गाजूल (हरणाट तांडा मुस्ती), संगिता रोडगे (उळे), कविता कोकाटे (वळसंग), हिरामणी कोमारी (म्हैसलगे ता. अक्कलकोट), महेजबीन गोलीवाले (विडी घरकुल कुंभारी), गंगाबाई मठपती (तीर्थ) आदी

# राज्यात पुढील 36 तास जोरदार पावसाचे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** २५ ते २७ सप्टेंबर (बुधवार ते शुक्रवार) पर्यतच्या पुढील ३ दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात वीजा व गडगडाटीसह जोरदार ते अति जोरदार परतीच्या पावसाची शक्यता जाणवते. मराठवाडा व विदर्भात मात्र ही परिस्थिती रविवार दि. ३० सप्टेंबर पर्यंत टिकून राहण्याची शक्यता जाणवते.

**छत्तीस तास अतिजोरदार पावसाचे १६ जिल्हे-**

आज दि.२५ (बुधवार) ची रात्र व दि.२६ (गुरुवार) चा दिवस व रात्र असे ३६ तास रत्न ागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर, नंदुरबार, धुळे, नाशिक, नगर, पुणे, सातारा, छ. सं.नगर, जालना, बीड अशा १६ जिल्ह्यात अंदाजे १२ ते २० सेमी. दरम्यानचा अति जोरदार किंवा काही ठिकाणी २० सेमी पेक्षाही अधिक अशा अत्याधिक जोरदार परतीच्या पावसाची



शक्यता जाणवते. विशेषतः मध्य महाराष्ट्रातील पर्जन्यच्छायेतील प्रदेशात या परतीच्या पावसाचा जोर पुढील ३६ तासात अधिक जाणवेल.

**पुरजन्य परिस्थिती**

कोकणातील मुंबई शहर व उपनगर, ठाणे व उपनगर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा ७ जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार, नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर अशा ६ जिल्ह्यात, यानुसार अशा एकूण १३ जिल्ह्यातील तापी, गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यात येत्या तीन दिवसात पूर परिस्थिती जाणवू शकते, असे वाटते.

# या पारध्यांचे काय करणार ?

**दत्तकुमार खंडागळे**
**मो.9561551006**

गेले महिनाभर ग्रामिण भागात चो-या होत असल्याचा दंगा सुरू आहे. गावोगाव त्याची चर्चा आणि गस्त सुरू आहेत. याचा परिणाम म्हणून गावाच्या आसपास कुठले पारध्यांचे कुटूंब आले, पारधी समाजाचा एखादा पुरूष, एखादी महिला आली की पकडायचे, मारायचे, बांधून घालायचे असे प्रकार सुरू आहेत. फासे पारधी नावाची जमात आम्ही स्वातंत्र्याच्या पंच्चाहत्तर वर्षानंतरही माणसात घेतली नाही. त्यांच्याकडे माणूस म्हणून आम्ही पाहत नाही. ही लोकं गावाजवळ येवून राहिली की त्यांच्या झोपड्या पेटवायच्या, त्यांना उठवून घालवायचं, त्यांना हाकलून द्यायचे. गावात येवू द्यायचे नाही. अशा पध्दतीचे वर्तन त्यांच्यासोबत केले जाते. या जमातीतील काही लोक करत असतील चो-यामा-या पण ते पोटासाठीच करतात ना? एखाद्या पारध्याने केलीच चोरी तर त्यातले साठ-सत्तर टक्के पोलिसच ढापतात. गुन्हे मात्र पारध्यांच्यावर दाखल होतात, बदनाम होतात पारधीच. त्यांच्यातला निम्म्यापेक्षा माल ढापणारे पोलिस दादा मात्र समाजात इज्जतीने, सन्मानाने वावरत असतात. त्यांना कुणी चोर म्हणत नाहीत. पारधी समाजावर ही वेळ आणली कुणी?

या फासेपारधी जमातीला आजवर कुठल्या गावाने, गावातील लोकांनी सन्मान दिला? सन्मानाने वागवले? त्यांना गावात जागा देऊन त्यांना हक्काची घरे कुणी बांधून दिली आहेत का? पारध्यांना रोजगाराचे साधन निर्माण करून दिले आहे का ? त्यांचे किती प्रमाणात पुनर्वसन केले आहे? याचं चिंतन समाजानं जरूर करावं. समाजाकडून त्यांना जनावरांच्यापेक्षाही वाईट वागणूक दिली जाते. त्यांच्याकडे माणूस म्हणूनही पाहिले जात नाही. लोक त्यांना बेदम मारतात, कित्येक ठिकाणी त्यांचे जीवसुध्दा घेतले जातात. ज्या लोकांशी समाज असा वागतो त्या लोकांशी त्यांनी कसं वागलं पाहिजे ? पारध्याना माणूस म्हणूनही न पाहणा-या समाजाशी त्यांनी कसा व्यवहार करावा ? पारध्यांनी अशा लोकांचे गळे चिरले तर त्यांचं काय चुकलं? त्यांनी पोटासाठी अशा निष्ठूर, नालायक आणि अमानूष समाजाला लुटलं तर त्यांचं काय चुकलं? त्यांना गुन्हेगार व्हायला कारणीभूत कोण आहे? अजून किती पिढ्या? किती शतकं आपण त्यांच्या कपाळी गुन्हेगारीचे शिक्के मारणार आहोत? याचं चिंतन तमाम समाजानं करावं.

पोटासाठी चोरी करणा-या पारध्यांना दिसेल तिथे संशयाने बेदम ठोकलं जातं. मरेपर्यंत मारलं जातं. त्यांच्या झोपड्या जाळल्या जातात. गावाजवळ आले तर हाकलून दिले जाते. त्यांच्यातील महिला व मुलींनाही डांबून चोपलं जातं. स्त्री म्हणून त्यांच्याशी आदराने कधीच व्यवहार होत नाहीत. कधी त्यांच्याकडे सन्मानाने पाहिलं जात नाही. पण दुस-या बाजू याच तथाकथित सभ्य समाजातले लब्ध प्रतिष्ठीत लोक रोज समाज उभा आडवा लुटतात. समाजाला रोज टोप्या घालतात. रोज देशाला कुरतडतात. या देशातल्या तमाम आमदार-खासदारांच्या घरातली संपत्ती खरंच इमानदारीने जमा केलेली आहे का? त्यांनी ती कष्टाने कमावलेली आहे का? आज प्रत्येक आमदार, खासदार करोडपती आहेत. गरीब जनतेचे सगळे प्रतिनिधी करोडपती कसे काय झाले? त्यांच्याकडे कुठल्या आणि कशाच्या जोरावर करोडोच्या संपत्तीचे निर्माण होतं? त्यांच्याकडे करोडपती व्हायचा कोणता फॉम्युर्ला आहे? याचं उत्तर कुणीही द्यावं. तीस चाळीस वषार्पुर्वी ज्या भडव्यांच्या बुडाखाली सायकल नव्हती त्यांच्याच घरात आज करोडो रूपयांची प्रॉपर्टी आली कोठून? ते कधी कामावर जात नाहीत, नोकरी करत नाहीत, कुठला धंदा करत नाहीत. मग इतकी अफाट संपत्ती आली कशी? बहूतेक धंदे कागदावरचे असतात. असे असतानाही त्यांची प्रॉपर्टी करोडोनं वाढत असते. देशातल्या या तथाकथित सभ्य लोकांनी देश लुटला की फासं पारध्यांनी देश लुटला? याचं प्रामाणिक उत्तर समाजानं द्यावं. फासेपारधी एखादी चोरी करताना झटापटीत एखाद्याचा गळा चिरतही असतील पण हातातली सत्ता अबाधीत रहावी, गेलेली सत्ता पुन्हा यावी म्हणून जाती-धर्माच्या दंगली घडवत शेकडो लोकांचे गळे कोण चिरतं? शेकडो लोकांची घरं कोण जाळतं? समाज अशा हरामखोरांसाठी पायघड्या टाकतो. त्यांचा आदर-सत्कार करतो, त्यांना मुजरे करतो. त्यांचे तळवे चाटतो. त्यांच्यासाठी हा दांभिक समाज कधी गस्त घालत नाही. हे भडवे देश लुटतात म्हणून कधी त्यांच्या बखोटीला धरत नाही की त्यांना कधी जाब विचारत नाही. निवडणूका आल्या की त्यांनी समाजावर, देशावर दरोडे टाकून मिळवलेली संपत्ती वाटली जाते. मतांसाठी दारू, मटन वाटले जाते. या डाकूंनी दिलेली विष्ठा लोक गपगुमान खातात. पोटासाठी चोरी करणा-या पारध्यांसाठी गावोगाव गस्त घालतो. पण पांढरी कपडे घालून देश खुलेआम लुटणा-या नालायकांच्या चो-या रोखण्यासाठी आम्ही गस्त घालणार का ? त्यांच्या लुटमारीपासून देश वाचवणार का? समाजाला हा प्रकार चोरी, डाका किंवा दरोडा तरी वाटतो का? पोटासाठी पाकीट मारणारांचे जीव घेणारे आम्ही लोक या लोकांचे काय वाकडे करणार? त्यांची वाकडी करण्याचा दम आहे का आमच्यात? याचा गांभियार्ने विचार करावा लागेल. देशाला राजरोस लुटणा-या या पारध्यांच आम्ही काय करणार? हा खरा प्रश्न आहे.


पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमाच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए / पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौंन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# 'बदला'पूर

गेल्या महिन्यामध्ये बदलापूर येथे शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याच्या गुन्ह्याखाली अटकेत असलेला आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला. त्यामुळे या विषयाला पूर्णविराम मिळाला असे वाटत असले, तरी त्यामुळे अनेक नवीन प्रश्नही निर्माण झाले आहेत. तळोजा कारागृहातून चौकशीसाठी ठाण्याला नेले जात असताना पोलीस व्हॅनमध्ये ही घटना घडली आणि आरोपी ठार झाला. जेव्हा जेव्हा पोलिसांच्या ताब्यातील संशयित आरोपी अशा प्रकारे पोलिसांवर गोळीबार करण्याच्या प्रयत्नात चकमकीत ठार होतात तेव्हा नेहमी संशयाचे वातावरण तयार होते. या घटनेबाबतही तशाच प्रकारची वातावरण निर्मिती झाली आहे. गेल्या महिन्यामध्ये जेव्हा हा प्रकार समोर आला होता तेव्हा बदलापूरमधील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करून रेल्वेसेवा विस्कळीत केली होती. आरोपीला सर्वांसमोर आणून जाहीर फाशी देण्याची मागणीही केली होती. त्यावेळी लोकांच्या भावना तीव्र असल्याने त्यांची ती मागणी जरी समजण्यासारखी असली, तरी अक्षय शिंदेला चकमकीत ठार करून पोलिसांनी त्या मागणीची अप्रत्यक्षपणे पूर्तता केली आहे की काय, याचीही चौकशी करण्याची गरज आहे. मुळात भारताला किंवा महाराष्ट्रालाही अशा प्रकारच्या चकमकीच्या घटना नवीन नाहीत. यापूर्वी पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याच्या प्रयत्नात अनेक गुन्हेगारांचा खात्मा करण्यात आला आहे. मुंबईत टोळी युद्धातील अनेकांना अशाच प्रकारे संपवण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी तेलंगणामधील बलात्कार प्रकरणातील आरोपींचा सुद्धा अशाच प्रकारे चकमकीत खात्मा करण्यात आला होता.

उत्तर प्रदेशातील पोलिसांवर प्राणघातक हल्ला करून आठ पोलिसांना ठार मारणारा गुंड विकास दुबे आणि त्याच्या साथीदारांना सुद्धा अशाच प्रकारे चकमकीत ठार मारण्यात आले होते. सर्वसाधारणपणे जेव्हा अशा प्रकारच्या घटना घडतात तेव्हा सर्व सामान्य नागरिकांची भावना 'झाले ते बरे झाले' अशाच प्रकारची असते. पण अशा प्रकरणांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

भारतीय न्याय प्रक्रियेप्रमाणे एखादा गुन्हा घडल्यावर पोलिसांनी त्याचा तपास करायचा आणि साक्षी पुराव्यांसह आरोपीला न्यायालयासमोर उभे करायचे. ते साक्षीपुरावे तपासून न्यायालयाने तो आरोपी दोषी आहे का निर्दोष आहे हे समजून निकाल द्यायचा, ही सर्वमान्य लोकशाही पद्धत आहे. कोणत्याही आरोपीला न्यायालयाच्या व्यासपीठावरच शिक्षा मिळणे गृहीत धरलेले असते. पण जेव्हा अशा गुन्हेगाराला न्यायालयाच्या पायरीपर्यंत न नेताच त्याचा निवाडा केला जातो तेव्हा मात्र संशयाची सुई पोलिसांकडे फिरू शकते.

या प्रकरणामध्येही अक्षय शिंदे हा एकटा आरोपी नाही, तर शाळेचे संबंधित व्यवस्थापन, काही शिक्षिका आणि शाळा मदतनीस यांच्यावरही गुन्हा दाखल केला आहे. आता या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणजे ज्याने प्रत्यक्ष गुन्हा केला तो अक्षय शिंदे जरी संपला असला, तरी इतर आरोपींची न्यायालयीन प्रक्रिया सुरूच ठेवावी लागणार आहे. या सर्व लोकांना वाचवण्यासाठीच पोलिसांनी अक्षय शिंदे यांचे बोगस एन्काउंटर केल्याचा दावा आणि आरोप आता विरोधी पक्षांकडून केला जात आहे, त्याचा विचार करावा लागणार आहे.

अशा प्रकारची चकमकीची घटना घडली की नेहमीच सरकारकडून चौकशीचे आदेश दिले जातात. पण असा चौकशीचा अहवाल कधी समोर येतो आणि त्याचे निष्कर्ष काय आहेत याबाबत नेहमीच गूढ असते. यावेळीसुद्धा या चकमकीची चौकशी जाहीर करण्यात आली आहे. पण जे चौकशी करणार तेसुद्धा पोलीस आणि ज्यांची चौकशी होणार तेसुद्धा पोलीस असल्यामुळे जे आतापर्यंत माध्यमांच्या समोर आले आहे तशाच प्रकारचे निष्कर्ष अशा चौकशी अहवालातून समोर येतात हेसुद्धा खरे आहे. अनेक वेळा अशा प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाकडूनही दिले जाऊ शकतात. जसे तेलंगणा चकमकीमध्ये घडले होते आणि न्यायालयाने अशा घटनांबद्दल नाराजीही व्यक्त केली होती. अशा प्रकारच्या घटनांमध्ये लोकभावना सर्वसाधारणपणे पोलिसांच्या आणि सरकारच्या बाजूने असली, तरी भारतासारख्या लोकशाही देशामध्ये अशा प्रकारे एखाद्या गुन्हेगाराला शासन करणे न्यायालयीन प्रक्रियेचा अवमान करण्यासारखेच होते.

काही वर्षांपूर्वी नागपूर येथे न्यायालयामध्येच एका बलात्कारी आरोपीचा अशाच प्रकारे अनेक महिलांनी ठेचून खून केला होता. त्या प्रकरणामध्ये पोलिसांचा काहीही संबंध नव्हता. त्या आरोपीला अशा प्रकारे मारर्णाया महिलांवरही कारवाई झाली होती. कायदा सर्वसामान्य नागरिकांनी हातात घेतला किंवा पोलिसांनी चुकीच्या पद्धतीने हातात घेतला तरी त्यांच्यावर देशातील लागू कायद्याप्रमाणे कारवाई करणे गरजेचे असते. तशीच कारवाई या घटनेबाबतही होण्याची अपेक्षा आहे. अर्थात मुख्य आरोपी जरी ठार झाला असला तरी या प्रकरणाचा तपास थांबता कामा नये. कारण संबंधित शाळेतील व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे आणि नंतर पोलिसांनीसुद्धा केलेल्या दुर्लक्षामुळे हा प्रकार वाढला होता, हेसुद्धा नाकारून चालणार नाही. प्रत्यक्ष गुन्हेगाराला अशाप्रकारे अप्रत्यक्षपणे शासन झाले असले, तरी ही परिस्थिती निर्माण करर्णाया संबंधितांवर योग्य प्रकारे न्यायालयीन कारवाई झाली तरच बदलापूर प्रकरणाला खऱ्या अर्थाने पूर्णविराम मिळाला, असे म्हणता येईल आणि पीडित मुलींनाही न्याय मिळेल.

# बदलापूर एन्काऊंटरचे स्वागतच; अशाच पध्दतीने भ्रष्टाचाऱ्याचे सुध्दा एन्काऊंटर व्हायला हवेत; कारण ते १४० कोटी जनतेचे रक्त पितात

बदलापूरमधील दोन बालिकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी दिनांक २३ सप्टेंबर २०२४ ला सायंकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. बदलापूर लैंगिक अत्याचाराचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात पसरले होते व सर्वत्र या घटनेचा निषेध करण्यात आला होता व राज्यभरात या घटनेने संतप्त नागरिकांनी आंदोलन सुध्दा केले होते.या प्रकरणात बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात "पोक्सा"आणि अन्य कलमांतर्गत दोन गुन्हे दाखल केले होते व पोलिसांनी या गुन्ह्यात शाळेतील सफाई कर्मचारी (कंत्राटी) अक्षय शिंदे याला अटक केली होती.या गुन्हेगाराचा सोमवारी पोलिस चकमकीत मृत्यू झाला व सध्याच्या परिस्थितीत यावर पक्ष-विपक्ष मोठ्या प्रमाणात राजकारण करीत असल्याचे दिसून येते. शेवटी गुन्हा हा गुन्हाच असतो. याचे श्रेय राजकीय पुढाऱ्यांनी न घेता पोलिस विभागाला द्यायला हवेत व पुढील जे काही कारवाई होणार आहे किंवा करायची ती कायद्याच्या चौकटीतुन होवू द्यावी यात राजकीय हस्तक्षेप नकोच.आज देशात अनेक बलात्कारी जमानत किंवा पॅरोलवर बाहेर आहेत ही बाब योग्य नाही. देशात लैंगिक अत्याचार, बलात्कारी, अट्टल गुन्हेगार यापेक्षा सर्वात मोठे गुन्हे देशात घर करून बसले आहेत ते गुन्हेगार म्हणजे "भ्रष्टाचारी" आज देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला मुठभर भ्रष्टाचाऱ्यांनी पोखरून टिकले आहे. आज देशात भ्रष्टाचार येवढा उफाळलेला आहे की गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पित आहे.त्यामुळे यांचा एन्काऊंटर होने अत्यंत गरजेचे आहे.देशात भ्रष्टाचाराची जळे-मुळे सर्वात जास्त राजकीय वतुर्ळात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे पोलिस विभागाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांचा बालबाका होत नाही व कायद्याच्या चाकोरीतून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरूच रहातो. यालाही आश्चर्यच म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचारी करोडो, अरबो रुपए घेऊन देशांच्या बाहेर फरार होतात. परंतु आपण काहीच करू शकत नाही व हातावर हात ठेवून बसुन राहातो.ही सुद्धा शोकांतिका म्हणावी लागेल. त्याच प्रमाणे देशात आजही राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने व भ्रष्टाचार करून कमविलेली करोडो रूपयांची चल-अचल संपत्ती मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्या सात पीढ्या आरामात बसून खावु शकतात या पध्दतीने संपत्ती जमवीलेली आहे.यामुळे प्रत्येक भ्रष्टाचारी देशाचे मालक समजतात व गरीब, सर्वसामान्यांना हाल-अपेष्टा सहज कराव्या लागतात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की भ्रष्टाचारी; देशाचे व देशाच्या १४० कोटी जनतेचे सर्वात मोठे गुन्हेगार नाहीत? त्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी एन्काऊंटर चांगली पध्दत आहे याचा उपयोग भ्रष्टाचाऱ्यांवर झाला तर देशातील महागाई, बेरोजगारी अवश्य कमी होवून गरीब व सर्वसामान्यांना दिलासा मिळेल आणि देश प्रगतीपथावर येईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# नऊ दिवसांनंतर मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी ९ दिवस उपोषण केल्यानंतर बुधवारी उपोषण मागे घेतलं. मराठा समाजाला होत असलेल्या त्रासामुळे आपण हा निर्णय घेत आहोत, असं जरांगे म्हणाले. यावेळी त्यांनी सरकारलाही इशारा दिला आहे.



मनोज जरांगे म्हणाले की, माझं उपोषण सुरु असताना लोकांचा त्रास मला सहन होत नाहीये, कोटार्चा मी सन्मान करतो.. उपोषण करुनही आता काही फायदा नाही. आता उपोषण स्थगित करत आहोत.

"सरकारने मराठ्यांना आरक्षण दिलं नाही तर नाही देऊ द्या, आपण सत्तेत जाऊ, आपले लोक सत्तेत गेले पाहिजेत. आपण सरकारला संधी दिली होती, पण आता त्यांनी वेळ चुकवली आहे. समाजाच्या महिला, मुलं, श्रीक्षेत्र नारायणगड हे सकारपेक्षा मोठे आहेत. त्यामुळे उपोषण स्थगित करत आहे."

मनोज जरांगे पुढे म्हणाले, सरकार मला बदनाम करु शकतं, पण ते मला मॅनेज करु शकत नाहीत. उपोषण सुटलं की मराठा समाजाला सांगतो, दवाखान्यात कुणी येऊ नका. मी उपचार घेऊन पुन्हा अंतरवालीमध्ये येतो, तेव्हाच आपण भेटूया. डॉक्टरचाच दवाखाना असून त्याला म्हणतेत बाहेर हो. आता माझं शरीर संपलं आहे, चार-पाच दिवस आरामाची गरज आहे.

फडणवीसांचं नाव घेऊन जरांगे म्हणाले की, फडणवीस साहेब मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या मान्य करा. मुख्यमंत्री आणि दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांनी फडणवीसांच्या जाळ्यात अडकू नये.. तुम्हाला संधी आहे आमचं ओबीसीमधलं आरक्षण आमचं आम्हाला द्या. आचारसंहिता लागेपर्यंत आरक्षण मिळालं नाही तर मराठ्यांना खचून जायची गरज नाही. सरकारने आपल्या लेकरांशी धोका केला तर तुम्ही तुमच्या मुलाशी धोका करु नका.. या सरकारला धडा शिकवा.

# सुशिक्षित बेरोजगार डीएड-बीएडधारकांची नियुक्ती

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** दहापेक्षा कमी पटसंख्येच्या जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आता सुशिक्षित बेरोजगार डीएड-बीएडधारकांची नेमणूक होणार आहे. त्यांना दरमहा १५ हजार रुपयांचे मानधन दिले जाणार आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या ७२ शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नेमणुकीची प्रक्रिया सुरु झाली आहे. तत्पूर्वी, कमी पटाच्या शाळांमधील दोनपैकी एका नियमित शिक्षकाची नेमणूक दुसऱ्या शाळांमध्ये करण्यात आली आहे. त्याठिकाणी आता कंत्राटी शिक्षक नेमले जाणार आहेत. या




पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरतीला ब्रेक लागणार आहे.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी स्पर्धा करताना जिल्हा परिषदांच्या शाळांची पटसंख्या कमी होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदांच्या अनेक शाळांमध्ये सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्यात येत आहेत. पण, स्वतंत्र विषयांचे शिक्षक विशेषतः इंग्रजी व विज्ञानाचे शिक्षक कमीच आहेत. तरीदेखील सहा ते सात वषार्नंतर यंदा जिल्हा परिषदांच्या शाळांमधील ३० हजार शिक्षकांची भरती करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आणि त्यातील २० हजार पदे भरली गेली. मात्र, उर्वरित पदांसह अन्य रिक्त पदांची भरती आता कंत्राटी शिक्षक भरतीमुळे थांबली आहे. राज्यातील जिल्हा परिषदांच्या कमी पटसंख्येच्या शाळांवर पाच हजार कंत्राटी शिक्षक नेमले जाणार असून तेथील पूवीर्चे पाच हजार शिक्षक दुसऱ्या शाळांमध्ये पाठविण्यात आले आहेत.

## प्रबोधन

# राष्ट्रभाषेविना । राष्ट्र मुके आहे

बोलके देश आणि मुके देश, अशी देशांची वर्गवारी असते काय? आणि जर तसं वर्गीकरण असेल, तर आपला देश बोलका आहे की मुका आहे? राष्ट्रपिता गांधीजींनी राष्ट्रभाषेविषयी एकदा म्हटलं होतं की, 'ज्या देशाला स्वतःची राष्ट्रभाषा नसते तो देश मुका असतो.' वास्तविक हिंदी ही राज्यघटनेनुसार भारताची राष्ट्रभाषा असूनही, राष्ट्रभाषा म्हणून ती भारतव्यापी नाही. त्यामुळेच १४ सप्टेंबर हा हिंदी ह्या राष्ट्रभाषेचा जयंतीदिन आहे की स्मृतिदिन आहे, असा प्रश्न राष्ट्रप्रेमी व्यक्तींना नक्कीच पडेल.

हिंदी भाषेवर नितांत प्रेम करणारे महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या कायार्चाच एक भाग म्हणून हिंदीच्या प्रसार-प्रचाराला आपलं जीवितकार्य मानलं. 'हिंदी भाषेच्या द्वारे सर्व भारत देशाला एका धाग्यात ओवता येईल,' असा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सतत व्यक्त केला. त्यांच्या कायार्पासून प्रेरणा घेऊन नागरी प्रचारिणी सभा, मद्रास, हिंदी प्रचार समिती वर्धा, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे अशा हिंदी भाषा प्रचार- प्रसारकर्त्या शिक्षण संस्था निर्माण झाल्या. त्यांनी पदव्युत्तर पातळीपर्यंतचे हिंदी भाषेचे अभ्यासक्रम राबवले.

भारत हे लोकशाही राष्ट्र आहे. त्यामुळे राष्ट्रभाषेचा मान हिंदीला मिळणं स्वाभाविक होतं. राष्ट्रवीर सुभाषचंद्र बोस यांनी तर हिंदी भाषेला राष्ट्रभाषेच्या पदावर स्थापित करताना म्हटलं होतं, 'देशाच्या सर्वात मोठ्या भूप्रदेशाची भाषा म्हणून हिंदी हीच राष्ट्रभाषेच्या पदाची अधिकारिणी आहे.' पण हिंदीची आजची स्थिती लक्षात घेता ही अधिकारिणी आहे की वनवासिनी, असा संभ्रम निर्माण होईल इतकी हिंदी ह्या राष्ट्रभाषेची दुर्दशा आपल्या देशात होत आहे.

आपल्या देशाचं स्वातंत्र्यपूर्वकाळातील वळण देश हा देव असे माझा असं होतं, आज ते पूर्णपणे बदलले असून देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । ह्या चारशे वर्षांपूर्वीच्या रामदासी आदेशाचं काटेकोर पालन करण्यातच आजचा समाज धन्यता मानतो आहे. गांधीवादी कार्यकर्त्यांना राष्ट्रसेवा हाच धर्म वाटत होता. पण आज धर्मबुद्धीने राष्ट्रभावनेला पराभूत केलं आहे, हे तर भारताचं खरं दुर्भाग्य आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'भारताची प्रकृती आणि संस्कृती हा संशोधनाचा विषय असून भारतीयत्त्व या नावाचं जीवनसत्त्व किंवा विचारतत्त्व अस्तित्वात आहे काय? असेल तर यात धमार्चा भाग किती? इतिहासाचा वाटा किती? भाषांचं योगदान किती? या संदर्भात सत्यशोधन झालं पाहिजे.' अशा परिस्थितीत राष्ट्रभाषेच्या स्वीकाराचा वा समृद्धीचा प्रश्न तर दूरच राहो, मातृभाषेच्या विकासाकडेही कोणाचं लक्ष नाही, हा खेदाचा विषय आहे.

युरोप, अमेरिका, जपान, रशिया ही प्रगत राष्ट्र आपापल्या राष्ट्रभाषेत आपल्या देशाचा कारभार चालवतात. भारताने मात्र इंग्रजी भाषेच्या जोखडाखालून अजूनही आपली मान काढलेली नाही, आणि पुढेही कधी काढणार नाही.

गेल्या साठ वर्षात आपल्या विद्वानांनी हिंदी भाषेला पारिभाषिक शब्दशक्तीने सामर्थ्य प्रदान करून तिला ज्ञानभाषा बनवलं असतं, तर हा देश प्रगत राष्ट्रांच्या यादीत गणला गेला असता. डॉ. राजनाथ शर्मा म्हणतात, 'इंग्रजी- धार्जिण्या ज्येष्ठ सनदी नोकरशहांनी केंद्र सरकारांच्या दिशाहीन कारभाराचा गैरफायदा घेऊन अहिंदी प्रदेशातील जनतेत हिंदीविरुद्ध विषारी प्रचार केल्यामुळे हिंदी भाषा राष्ट्रभाषेच्या पदाला कायमची मुकली. ' मोठी लोकशाही मिरवणारा हा महादेश मुका असावा, हे केवढ दुर्दैव! म्हणून लक्षात घ्या-

'राष्ट्रभाषेविना। राष्ट्र मुके आहे'
गांधीजींचा आहे। उपदेश ॥ १
राष्ट्रभाषा म्हणे । हिंदी भारताची
सत्ता मात्र तिची। कोठे नाही ॥२
कोर्टकचेऱ्यात । इंग्रजीची सत्ता
स्वपुत्रांच्या लाथा। खाते हिंदी ॥ ३
सभेत सन्मान। घरी अपमान
हिंदीचे जीवन । दुर्भाग्याचे ॥४
कपाळीची बिंदी। हिंदीला म्हणती
खात्री न करती। आहे-नाही ॥५
राष्ट्रभाषा हिंदी। घोर उपेक्षित
वारस जिवंत। तिचा नाही ॥ ६
हिंदीदिन आज। झाला स्मृतिदिन
स्मृतीला वंदन। चला करू ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# खा. धैर्यशील व शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्याकडून मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी अंतरवाली-सराटी जि.जालना येथे महाराष्ट्रातील सकल मराठा समाजाच्या आरक्षणाच्या न्याय मागणीसाठी अमरमण उपोषणास बसलेल्या मनोज जंरागे पाटील यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस करत त्यांच्या न्याय मागणीस व सकल मराठा समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनास पाठिंबा दर्शवला.



तसेच सकल मराठा समाजाची न्याय मागणी लक्षात घेऊन आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यात यावा म्हणून महाराष्ट्र सरकारकडे मागणी करणार असल्याचे सांगितले.

जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी या गावात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण सुरु आहे. आज त्यांच्या उपोषणाचा नववा दिवस आहे. त्यांची प्रकृती खालावली आहे. अशातच कोर्टाच्या निदेर्शानसुार आपण उपचार घेत असून सलाईन लाऊन उपोषण करणे योग्य नाही, असे म्हणत आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून उपोषण स्थगित करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले.

दरम्यान आज दुपारी दोनच्या सुमारास खासदार धैर्यशील मोहिते पाटील व शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत घेऊन तब्येतीची काळजी घेऊन उपचार घेण्याबाबत विनंती केली. व मराठा समाजाच्या न्याय मागण्या शासन दरबारी मांडून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले.

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी खासदार धैर्यशील मोहिते पाटील व शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत कोर्टाच्या निदेर्शानुसार आपण आज उपोषण मागे घेत असून सर्वांनी मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

# सिंहगड पब्लिक स्कूलची आदिती भंडारे हीची धनुर्विद्या मध्ये विभागीय स्पर्धेसाठी निवड

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत अरण येथे झालेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या कंपाउंड राउंड या प्रकारात सिंहगड पब्लिक स्कूल ची 14 वर्ष वयोगटामधील अदिती भंडारे हिने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन करून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली.

आदितीच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक एम एन नवले सर, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे सर शाळेच्या प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी अदितीला क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले



# मुर्तीजापुर शहराचा 18 दिवसापासून पाणीपुरवठा बंद

## सर्व माजी नगरसेवकांचा मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**मुर्तीजापुर (कटूसत्य वृत्त):-** शहराचा अठरा दिवसापासून पाणीपुरवठा बंद असल्यामुळे सर्व माजी नगरसेवक आक्रमक होऊन मुख्याधिकारी ची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केलेले खांबोरा बंर्धायावरील असलेल्या वाटर सप्लाय प्लांट मधील असलेल्या दोन्ही 240 केवी च्या मशीनच्या वाइंडिंग दुरुस्ती करून आणल्यावर काल वॉटर पंप सुरू केल्यावर काही तासातच दोन्ही मशीन यांचे संपूर्ण वाइंडिंग जळाल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्या संदर्भात गैरसोय निर्माण होत आहे या संदर्भात मुख्याधिकारी शेषराव टाले यांच्या दालनात माजी नगरसेवक द्वारकाप्रसाद दुबे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष संदीप जळमकर शेख इमरान शेख खलील कैलास महाजन यांनी शहरातील अनेक गंभीर समस्या विषयी चर्चा केली मुर्तीजापुर नगर परिषद ने प्रशासन राज सुरू असल्यामुळे सर्व अधिकार नगर परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांना आहे तरी मुर्तीजापुर आठव्या दिवसापासून पाणीपुरवठा बंद असल्यामुळे पाण्यासाठी नागरिकांना वन वन भटकावे लागत आहे यासाठी नगरपरिषदेने त्वरित कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे संदीप जळमकर भारत जेठवानी कैलास महाजन शेख इमरान देविदास गोळे आशिष बरे शेकल्यास रवींद्र इंगळे विनायक गुल्हाने नाशिक ठेकेदार उपस्थित होते लकडगंज भागात पन्नास घर आजही पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे आतापर्यंत त्या भागात जलवाहिनी टाकण्यात न आल्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याची खंत कैलास महाजन यांनी मुख्याधिकारी कडे केली.

### पाणीपुरवठा सोबत घाण कचऱ्याची समस्या महत्त्वाची

मुर्तीजापुर शहरात कायमस्वरूपी पाण्याचा तोडगा आतापर्यंत करण्यात आलेला नाही तर दुसरीकडे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होत आहे तर अनेक ठिकाणी कचरा व कचरा उचलणाऱ्या गाड्यांची कमतरता नियोजन ढासळलेला असल्यामुळे नाहक लोकांना त्रास होत आहे यासाठी सुद्धा आंदोलनाची भूमिका घेतल्या जाईल

**- संदीप जळमकर,**
सामाजिक कार्यकर्ता

### प्लास्टिकची पाईपलाईन काढून फेका

पीव्हीसीला जर गावरानी भाषेत म्हटले तर स्टेशन परिसरात पाणीपुरवठा होत असलेल्या टाकी पासून असलेले प्लास्टिकची पाईपलाईन काढून फेका ज्यामुळे वारंवार पाईपलाईन फुटल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे या ठिकाणी नवीन जलवाहिनी टाका.

**- शे इम्रान,**
स्टेशन परिसर मुर्तीजापुर

### दलित वस्तीच्या निधीचा गैरवापर करू नका

गोरगरिबांसाठी शासन निधी देत आहे तर दुसरीकडे त्या दलित वस्ती निधीचा गैरवापर केला जात ज्यांना शासनाने निधी दिलेला आहे असे दलित वस्तीत हा निधी वापरण्यात यावे.

**- द्वारकाप्रसाद दुबे,**
माजी नगराध्यक्ष

## वात्रटिका

### गुरूजीचे आंदोलन

पेटून उठले गुरूजी तरी
यांना जाग येत नाही...
सरकारला गुणवत्तेचे
काही देणेघेणे नाही...
पगार पैशासाठी गुरुजींचे
आंदोलन नाहीच मुळी...
तरीही सरकारचे सोंग नि
अळीमिळी गुपचिळी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

